अॅग्रोमेटअॅडवायझरी बुलेटीन
ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐेएमएफयु,
कृषि हवामानशास्त्र विभाग
कृषि महाविद्यालय, पुणे ४११ ००५
फोन : ०२०-२९५१६२६४
ई-मेल : amfupune@gmail.com

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०३/०७/२०२६

## जिल्हा : सोलापूर

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०३/०७/२०२६ ते ०७/०७/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| पाऊस (मिमी) | 9.0 | 10.0 | 8.0 | 5.0 | 4.0 |
| कमाल तापमान (अं.सें.) | 32 | 32 | 31 | 31 | 31 |
| किमान तापमान (अं.सें.) | 23 | 22 | 22 | 21 | 21 |
| ढग स्थिती (आकाश) | 8 | 8 | 8 | 8 | 8 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 69 | 71 | 68 | 67 | 67 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 48 | 51 | 46 | 47 | 41 |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 20 | 23 | 26 | 28 | 23 |
| वाऱ्याची दिशा (अंश) | 254 | 254 | 243 | 242 | 246 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक ०३ व ०४ जुलै, २०२६ रोजी काही ठिकाणी तर दिनांक ०५, ०६ व ०७ जुलै, २०२६ रोजी तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • पावसाची शक्यता असल्याने पक्व झाले ल्या पिकांची, फळे व भाजीपाल्याची काढणी करुन सुरक्षीत ठिकाणी साठवणूक करावी तसेच पावसापासून संरक्षण होण्याच्या दृष्टीने योग्यरित्या झाकून ठेवावीत.<br>• ज्या भागात ८० ते १०० मिमी पाऊस झालेला आहे तिथे शेतकरी बांधवांनी पुरेसा ओला व्यावर पेरणी करावी. पेरणी करताना बीजप्रक्रिया करून पेरणी करावी.<br>• कमी पाऊस झालेल्या क्षेत्रात पेरणीची घाई करू नये व पुरेसा पाऊस झाल्यानंतरच पेरणी करावी.<br>• पेरणीसाठी सुधारित/ संकरित वाणांचे बियाणे शासकीय यंत्रणेकडून/ कृषि विद्यापीठांच्या विक्री केंद्राकडून घ्यावे.<br>• नत्र खत मात्रेच्या बचतीसीठी द्विदल पिकांना रायझोबियम , एकदल पिकांना अॅझोटोबॅक्टर जीवाणु संवर्धकाची पेरणीपूर्वी बिजप्रक्रिया करण्यासाठी वापरावे . जिवाणू संवर्धक खरेदी करताना पाकीटावरील अंतिम तारीख व पिकाचे नाव पाहूनच खरेदी करा.<br>• लागवड केलेल्या पिकाचे कीड व रोगासंदर्भात नियमित सर्वेक्षण करून , जर प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर असल्यास, विविध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>• कीटकनाशक, बुरशीनाशक आणि तणनाशकाची फवारणी करताना वेगवेगळी करावी. पिकावर कोणतेही कीटकनाशक, बुरशीनाशक किंवा तणनाशक फवारताना , त्या पिकाकरिता त्या रासायनिक औषधाचा लेबल क्लेम असल्याची खात्री करूनच वापर करावा.<br>• पावसाची शक्यता असल्याने कीटकनाशकाची व बुरशीनाशकाची फवारणी शक्यतो पावसाची उघडीप बघून करावी.<br>• भाजीपाला पीके जसे वांगी, भेंडी, गवार इ. लागवडीनंतर रसशोषक किडींच्या जैविक नियंत्रणासाठी पीकाच्या अवस्थेनुसार पिवळे चिकट सापळे, सापळा पीके, जैविक बुरशीनाशके (मेटारायझीयम, ट्रायकोग्रामा, व्हरटीसिलीयम इ.) यांचा वापर करावा आवश्यकता असल्यास रासायनिक कीड आणि बुरशीनाशकाचा वापर करावा.<br>• हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामा नाच्या पूर्वानुमाना करिता 'मेघदुत' मोबाईल अॅपचा वापर करावा. मेघगर्जना व विजेच्या पूर्वानुमानाकरिता 'दामिनी' मोबाईल अॅपचा वापर करावा.<br>• कृषिविषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषिदर्शनीचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा. |
| ऊस | पीक वाढीची अवस्था | ऊस पिकातील खोड किडी च्या जैविक नियंत्र णासाठी ट्रायकोग्रामा चिलोनिस (ट्रायकोकार्ड) ५ ते ६ ट्रायकोकार्ड १५ दिवसाच्या अंतराने प्रति हेक्टरी वापरावे तसेच ५ कामगंध सापळे (इ.एस.बी. ल्यूर) प्रति हेक्टरी वापरावे. |
| हुमणी कीड | किडीचे नियंत्रण | हुमणीचे भुंगेरे सुर्यास्तानंतर बाभूळ, बोर, लिंब या झाडांवर पाने खाण्यासाठी गोळा होतात. अशा झाडांच्या फांद्या रात्री काठीच्या सहाय्याने हलवून खाली पडलेले भुंगेरे गोळा करावेत व रॉकेल मिश्रित पाण्यात टाकून मारावेत. हा उपाय शेतकऱ्यांनी सामुदायिकरित्या करावा. त्यामुळे अंडी घालण्यापूर्वीच भुंगेऱ्यांचा नायनाट होईल. हुमणी अळीच्या जैविक नियंत्रणासाठी मेटारिझीयम अॅनिसोप्ली परोपजीवी बुरशी २० कि. प्रति हेक्टर जमिनीत मिसळावे (शेणखतामध्ये मिसळून टाकता आल्यास उत्तम). |
| मुग, उडीद, सोयाबीन | पेरणी | ज्या भागात ८० ते १०० मिमी पाऊस झालेला आहे तिथे शेतकरी बांधवांनी पुरेसा ओला व्यावर पेरणी करताना बीजप्रक्रिया करून पेरणी करावी. |
| केळी | पीक वाढीची अवस्था | पावसाची शक्यता असल्याने झाडे पडू नयेत म्हणून व वजनाने मोठ्या असलेल्या घडास गरजेप्रमाणे बांबूच्या किंवा पॉलीप्रोपेलीनच्या पाट्यांच्या सह्यायाने झाडांना/ घडांना आधार/ टेकू द्यावा. मातीतील ओलावा टिकविण्यासाठी व बाष्पीभवन रोकण्यासाठी अच्छादन (मल्चिंग) करणे फायदेशीर ठरेल. नवीन लागवड मृग बाग (जून लागवड) साठी शेत |

| | | |
|---|---|---|
| | | तयार करावे. लागवडीसाठी कंद मुनवे निरोगी आणि जातिवंत बागेतूनच निवडावे. ॲझोस्पिरीलम - २५ ग्रॅम व पी.एस.बी.-२५ ग्रॅम/ झाड, केळी लागवडीच्या वेळी शेणखतात मिसळून द्यावीत. वादळी वाऱ्यापासून बागेच्या संरक्षणासाठी सजीव कुंपणाचा वापर करावा. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या देशी गाय संशोधन प्रशिक्षण केंद्रांतर्गत पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाच्यावतीने विकसित करण्यात आलेल्या फुले अमृतकाळ (Phule Amrutkal App) या पशुसल्ला मोबाईल प्रणालीचे (ॲप) ॲपच्याद्वारे माहिती मिळवावी. तज्ज पशुवैद्यकाच्या सल्ल्याने जनावरांना जंतनाशक औषध पाजावे व शेवटच्या आठवडयात लाळखुरकत, फऱ्या व घटसर्प या रोगांच्या एकत्रित रोगप्रतिबंधक लसी टोचून घ्याव्यात. |

***टिप : शेतकरीबंधूनी किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्य ती खबरदारी/ काळजी धेऊन किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.**

**स्त्रोत : १) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.**
**२) मागील हवामान : -**
**ठिकाण : कृ.म.वि., पुणे . दि. : ०३.०७.२०२६**

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे,ऐएमएफयु, पुणे तथा**
**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**